12

कोंकण एज्युकेशन ॲण्ड मेडिकल ट्रस्टचे
होमिओपॅथिक महाविद्यालय, विरार
प्रवेशक्षमता वाढीस मंजूरी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

शासन निर्णय क्रमांक : एचएमसी-१८०२/३७७१/प्र.क्र. ६४१/०२/शिक्षण-२

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : २६ ऑगस्ट, २००४

वाचा :- केंद्रिय होमिओपॅथी परिषदेचे पत्र क्र.१२-१/२००२-सीसीएच/४३७७, दिनांक ३.९.२००२

**शासन निर्णय** :- केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन दि.३.९.२००२ च्या पत्राद्वारे कोकण एज्युकेशन ॲण्ड मेडिकल ट्रस्टचे होमिओपॅथिक महाविद्यालय, विरार या संस्थेची प्रवेशक्षमता ७५ वरुन १०० एवढी करण्यास सन २००२-२००३ पासून मंजुरी दिली आहे. प्रवेशक्षमता वाढीसंदर्भात संस्थेने मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अनुक्रमे रिट पिटीशन क्र.७३२१/०२ व क्र.४९२१/०२ प्रकरणी दिलेल्या निदेशाचा अन्वयार्थ व केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन संस्था सक्षम होण्याच्या दृष्टीने परिषदेने मंजुरी दिल्यानुसार प्रवेशक्षमता वाढीस मान्यता देण्याचा शासनाने आता निर्णय घेतला आहे. त्यानुसार सन २००४-०५, या वर्षापासून सदर संस्थांची प्रवेशक्षमता ७५ वरुन १०० अशी करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. होमिओपॅथीक महाविद्यालय, विरार या संस्थेच्या वाढीव प्रवेश क्षमतेस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, यांचे संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतरच वाढीव जागांवर प्रवेश करण्याची कार्यवाही संबंधितांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दत्तात्रय बोऱ्हाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. (५ प्रती)
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई. (५ प्रती)
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. (५ प्रती)
प्राचार्य, कोकण एज्युकेशन ॲण्ड मेडिकल ट्रस्टचे होमिओपॅथिक महाविद्यालय, विरार.
सर्व उप सचिव /अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक.
मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक.
निवडनस्ती (शिक्षण-२)

CERTIFIED
TRUE COPY

EDU-GR-1641
comp-69

I/C PRINCIPAL
KONKAN EDUCATION & MEDICAL TRUST'S
VIRAR HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE
(RECOGNISED BY GOVT. OF MAHARASHTRA)
VIR SAVARKAR MARG, VIRAR (E)-401 305. DIST. PALGHAR